## “स्वच्छ भारत अभियान” (सन 2022-23)

आमच्या यशवंत आयुर्वेदिक महाविद्यालय, पदव्युत्तर पदवी व संशोधन केंद्र , कोडोली, ता. पन्हाळा , जिल्हा. कोल्हापूर मध्ये आम्ही दरवर्षी स्वच्छ भारत अभियान उत्साहाने राबवत असतो . सन २०२२-२३ मध्ये देखील आम्ही स्वच्छ भारत अभियान या सदराखाली चार उपक्रम राबविले .

या उपक्रमाची माहिती पुढीलप्रमाणे

### १) प्लॅस्टिक कचरा मोहीम 15-10-2022

यशवंत आयुर्वेदिक महाविद्यालय कोडोली, येथे दि. 15 ऑक्टोबर 2022 रोजी स्वच्छ भारत अभियान राबविणेत आले. आपल्या परीसराला व पर्यायाने आपल्या देशाला स्वच्छ, निरोगी व नीटनेटके ठेवणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. खरे पाहता हा एक दिवस साजरा करण्याचा उत्सव नसून ती प्रत्येकाची दिनचर्या व्हायला हवी. हीच भावना राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकामध्ये व समाजामध्ये बिंबवण्यासाठी आम्ही कोडोली गावातील मंदिरांची, सामाजिक ठिकाणांची स्वच्छता केली. प्लॅस्टिक न वापरण्याविषयी जन जागृती केली. आमच्या महाविद्यालय व रुग्णालयामध्ये प्लॅस्टिक कचरा जमा करण्यासाठी वेगळया थैल्या ठेवल्या आहेत. यावेळी महाविद्यालयाचे सन्माननीय प्राचार्य डॉ. एम .एम . गोडबोले, डॉ. आर. डी. पाटील, डॉ. अभिजीत माने- पाटील इतर अध्यापक व राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवक विद्यार्थी उपस्थित होते.




प्लास्टिक कचरा मोहीमेमध्ये प्लास्टिक कचरा गोळा करताना विद्यार्थी




प्लास्टिक कचरा मोहीमेमध्ये प्लास्टिक कचरा गोळा करताना विद्यार्थी

**2) रुग्णालय आवार स्वच्छता १ डिसेंबर २०२२**

आमच्या यशवंत आयुर्वेदिक रुग्णालय कोडोली मध्ये दिनांक १ डिसेंबर २०२२ रोजी एन.एस.एस. च्या स्वयंसेवकांनी आवाराची स्वच्छता केली. कचरामुक्त रुग्णालय या विषयी जनजागृती केली. रुग्णालय आवारात प्लास्टिक कचऱ्यासाठी कचराकुंड्या बसविण्यात आल्या आहेत.



रुग्णालयातील कचरा कुंड्या 1

## 3) चिकुर्डे येथे विशेष श्रमसंस्कार शिबीर 03.02.2023 to 09.02.2023

राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिरामध्ये एकूण स्वयंसेवकांची दररोज चार गटात विभागणी केली जाते. १) सर्वे कमिटी २) स्वच्छता कमिटी ३) भोजन कमिटी ४) शिबीर कमिटी

पैकी स्वच्छता कमिटीचे १२ स्वयंसेवकांनी दररोज चिकुर्डे गावातील धार्मिक स्थळे, ग्रामपंचायत , चावडी, शाळांचे आवार आदी सार्वजनिक दृष्ट्या महत्वाच्या ठिकाणांची स्वच्छता केली.




चिकुर्डे येथे विशेष श्रमसंस्कार शिबीर 1




चिकुर्डे येथे विशेष श्रमसंस्कार शिबीर 2

**4) कोडोली ग्रामपंचायत कार्यालय व सचिवालय स्वच्छता 25 /02/2023**

जनसहभागातून ग्राम विकास या कार्यक्रमांतर्गत कोडोली गावातील ग्रामपंचायत कार्यालय , सचिवालय व महत्वाच्या रस्त्यांची स्वच्छता आमच्या महाविद्यालयातील एन. एस. एस. स्वयंसेवकांनी स्वच्छता केली व गावकऱ्याना स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले.



कोडोली ग्रामपंचायत परिसर स्वच्छता 1




कोडोली ग्रामपंचायत परिसर स्वच्छता 2